# <u>नियमित दिवाणी दावा क्र.१४/२०१९ मधील नि.क्र. २५ वरील आदेश</u>
**(CNR NO MHRG14-000206-2019)**

१. सदरचा अर्ज वादींनी त्यांना मयत वादी क्र. ५ सुशिला गजानन पाटील, वादी क्र. २ संजय गजानन पाटील व वादी क्र.१० साधना लक्ष्मण पाटील यांचे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झालेला असल्यामुळे त्यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रदद होवून त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करणेकरीता दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी निशाणी ३२ कडे म्हणणे देवून जोरदार हरकत घेतली आहे. त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला आहे की, सदरचा अर्ज हा खोटा व खोडसाळ आहे. केवळ दावा चालवण्यास उशीर व्हावा या हेतुने वादीने सदरचा अर्ज विलंबाने दिलेला आहे. वादीने विलंबाबाबत दिलेले कारण योग्य नूसन वादीचा अर्ज नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे. तसेच त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, जर न्यायाचे दृष्टीने सदरचा अर्ज मंजूर करावा असे वादीचे मत झाल्यास वादीवर जास्तीत जास्त खर्च बसवावा.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर दाव्यातील वादी क्र. ५ सुशिला गजानन पाटील या दि.११/११/२०१८ रोजी, वादी क्र. २ संजय गजानन पाटील हे दि.२९/०५/२०२१ रोजी व वादी क्र.१० साधना लक्ष्मण पाटील या दि.२८/११/२०१६ रोजी मयत झाल्या असून त्यांचे वारसांना अभिलेखावर घेणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. परंतु, कोरोना महामारीमुळे अत्यावश्यक कामांकरीता न्यायालये सुरु असल्यामुळे वादींना, वादी क्र. ५ सुशिला गजानन पाटील, वादी क्र. २ संजय गजानन पाटील व वादी क्र.१० साधना लक्ष्मण पाटील यांचे वारसांना अभिलेखावर घेण्यास विलंब झाला आहे. वादी क्र. ५ सुशिला गजानन पाटील यांना वादी क्र. १ ते ४ हेच वारस असून त्यांच्या नावापुढे मयत असे लिहून त्यांचे नाव दाव्यातून वगळण्याचे आहे. वादी क्र.१० साधना लक्ष्मण पाटील यांना वादी क्र. ७ ते ९, ११ व १२ हेच वारस आहेत. तर वादी क्र. २ संजय गजानन पाटील यांचे वारसांना दाव्यात हजर होवून त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता वादी क्र. ५ सुशिला गजानन पाटील, वादी क्र. २ संजय गजानन पाटील व वादी क्र.१० साधना लक्ष्मण पाटील यांचे यांचेविरुध्द झालेला उपशम (abatement) आदेश

रदद करुन त्यांचे वारसांना अभिलेखावर घेणे योग्य व संयुक्तिक आहे. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**<u>आदेश</u>**

| वादीचा अर्ज मंजूर करणेत येत आहे. |
|---|

WALI NILESH MALAKAPPA
Digitally signed by WALI NILESH MALAKAPPA
Date: 2022.02.18 17:28:36 +0530

ठिकाण – उरण (निलेश म. वाली)
दिनांक – १८/०२/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.